# बृहन्महाराष्ट्र वृत्त

On the web
www.bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र
उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

सप्टेंबर २००९
वर्ष २९, अंक ९

## अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

नुकताच गणपती उत्सव सर्व मंडळांमध्ये उत्साहाने पार पडला. यंदाच्या गणेश उत्सवाला फिलाडेल्फिया व न्यूयॉर्क मंडळांच्या निमंत्रणाला मान देऊन प्रमुख पाहुणी म्हणून मी उपस्थित राहिले. बृ. महाराष्ट्र (बृ. म.) मंडळाची अध्यक्षा या भूमिकेतून मला आमच्या समितीच्या कार्याची माहिती देता आली. Montreal येथील मंडळालाही त्यांच्या सुचनेनुसार मी माहितीपर संदेश पाठवला.

गेल्या महिन्याभरात कार्यकारिणीबरोबर मी कामाचे नियोजन केले. बृ. म. मंडळाने हाती घेतलेल्या प्रकल्पाची माहिती (slide presentation) मी सर्व मंडळांना पाठवली आहे. ते प्रकल्प असे:

१. सर्व मराठी मंडळांशी सतत संपर्कातून संबंध बळकट करणे
२. राष्ट्रीय स्तरावर मराठी शाळेचा उपक्रम चालवणे
३. उत्तर अमेरिकेतील गुणी कलाकारांना प्रोत्साहन देऊन मराठी मंडळात त्यांचे कार्यक्रम ठरवणे
४. भारतातील कलाकारांच्या कार्यक्रमांचे नियोजन
५. वयोवृद्धांसाठी केंद्रे उभी करण्यासाठी प्राधान्य देणे
६. तरुण पिढीला प्रोत्साहन देऊन बृ. म. मंडळातील त्यांचा सहभाग वाढवणे
७. उत्तर अमेरिकेतील उद्योजक व महाराष्ट्रातील उद्योजक आणि संस्था यांचा समन्वय साधणे
८. बृ. म. मंडळाच्या कामाची पद्धती, घटना याचे लेखन करणे

माझ्याबरोबर नवीन कार्यकारी समितीचे काम नुकतेच सुरु झाले आहे. त्यामुळे अजूनही काही उद्दिष्टांचा विचार केला जाईल. यासंबधी जास्त माहिती पुढील वृत्तात देईन. बृ. म. मंडळाच्या कार्यकारी समितीवरील प्रत्येक सदस्य हा त्याच्या प्रांतामधील वेगवेगळ्या मंडळाचा विभागीय प्रतिनिधी असेल. त्याबद्दल अधिक माहिती पृष्ट २ वर दिली आहे. याच अंकापासून श्री वैभव पुराणिक (कॅलिफोर्निया) यांनी वृत्ताचे सह-संपादक म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांचे बृ. म. मंडळाच्या कुटुंबात हार्दिक स्वागत.

वृत्तासाठी जास्तीत जास्त सभासद मिळवणे त्याच बरोबर बृ. म. मंडळाचे "Mom's Kitchen" या पुस्तकाची ओळख सर्वांना करून देणे जरुरीचे आहे. गणपतीच्या समारंभात सर्वत्र ह्या पुस्तकाची विक्री चांगली झाली. दिवाळीची भेट म्हणूनही याचा जरूर विचार करावा. त्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा करते. कळावे,

**माधुरी जोशी**
अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ
*msjoshi17@yahoo.com*

## Message to Youth from the BMM Adviser

The summer season is almost over and the fall season is starting. We said bye to Ganapati Bappa with his promise to come back. The autumn leaves will start to change colors and we are adding a new color to Vritta. We will be providing English synopsis to Marathi articles in Vritta to make it easier for the young generation. We would like to know if you find it useful.

BMM is also planning to enhance integration with our fellow Marathi mandals by contacting them to understand and help them per their needs. We have assigned a group of mandals to each Executive Committee (EC) members and they will soon be contacting mandals to gather information for the same. You will find that information in the current Vritta edition. Our long term emphasis is going to be channeling our efforts towards young generation and senior citizens in our Marathi community so feel free to contact our EC members. We have also started preparing guidelines for our next convention. We have received lots of feedback and suggestions and we want to make the next Chicago convention successful.

Remember Vritta is your paper so please provide your support by subscribing it and sending your articles? Please also consider buying "Mom's Kitchen" Book from BMM Mart which has Mom's recipes made easy for you.

As we say in Marathi, एकमेका सहाय्य करू,अवघे धरू सुपंथ, that means let us help each other and follow the right path. For more information about Maiytra and BMM activities, visit bmmonline.org .

See you soon.

**Anand Joshi**
BMM Board of Advisory Committee member
*anandj@optonline.net*

### या अंकात ...

| | |
|---|---|
| विविध मंडळांचे विभागीय प्रतिनिधी: | २ |
| मराठी मंडळांतून फेरफटका, नवे सदर: 'माझ्या वाचनात आलेले' | ३ |
| स्मरणगंध: | ४ |
| योग शास्त्र: लेख क्र. १ | ५ |
| पुस्तक परिचय: 'मेघ जे तरळून गेले': | ६ |
| भारत भेटीतील मास्को नाव्य: | ७-८ |
| शेवटचे पान: | ९ |
| Message from Maiytra President, Vrutta synopsis in English for youth | १० |

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्रमंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

**संस्थापक:**
कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** विनता कुलकर्णी, पिओरिया, इलिनॉय
**सह–संपादक:** वैभव पुराणिक, लॉस एंजेलिस
**संपादन–सल्लागार:** मोहन रानडे, विद्या हर्डीकर
**वृत्तासंबंधित कार्यकारिणी प्रतिनिधी:** मिलिंद गोखले

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com

**वर्गणीचे दर**

| Paper Copy | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक: | $ 21 | $ 26 | $ 41 |
| द्वैवार्षिक: | $ 40 | $ 50 | $ 80 |
| आजीव: | $250 | $350 | $375 |

**Electronic copy : $10 /year**

**जाहिरातीचे दर**

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान: | $155 | $220 |
| अर्धे पान: | $ 85 | $115 |
| पाव पान: | $ 50 | $ 70 |
| अष्टमांश पान: | $ 35 | $ 40 |

- वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.
- पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.

**बृहन्महाराष्ट्रमंडळाची कार्यकारिणी (२००९-२०११)**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:** | माधुरी जोशी | मॉन्टव्हिल, न्यू जर्सी |
| **कार्यवाह:** | लीना देवधरे | टोरांटो, कॅनडा |
| **कोषाध्यक्ष:** | अजय दांडेकर | लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया |
| **सभासद:** | मिलिंद गोखले | डेनव्हर, कोलोराडो |
| | मंदार जोगळेकर | फिलाडेल्फिया, पेनसिल्व्हेनिया |
| | शाम नवाथे | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | कीर्ती रेगे | सिनसिनाटी, ओहायो |
| | दिलिप थत्ते | शिकागो, इलिनॉय |

**माजी अध्यक्ष:** गिरीश ठकार, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
**सल्लागार:** विद्या हर्डीकर सप्रे, लॉस एंजेलिस, श्री ठाणेदार, मायामी, आनंद जोशी, एडिसन, न्यू जर्सी
**MAIYTRA**: मैत्र प्रतिनिधी: विशाल नायक, सॅन होजे, कॅलिफोर्निया

**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्रमंडळ, उत्तर अमेरिका
26 Avalon Dr, Montville, NJ 07045
msjoshi17@yahoo.com www.bmmonline.org

## विविध मंडळांचे विभागीय प्रतिनिधी

उत्तर अमेरिकेतील सर्व महाराष्ट्रमंडळांशी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून वैचारिक देवाण घेवाण करणे व परस्पर संबंध अधिक दृढ करणे या उद्देशाने बृ. म. मंडळाच्या समितीवरील सदस्य खालील प्रांतांमधील वेगवेगळ्या मंडळांचे विभागीय प्रतिनिधीत्व (zonal representative) करीत आहेत. सर्व महाराष्ट्र मंडळांचे अध्यक्ष, प्रतिनिधी तसेच बृ. म. मंडळाचे सभासद यांनी बृ. म. मंडळाच्या विविध उपक्रमांबाबत मार्गदर्शन, विचार किंवा सूचना खालील विभागीय प्रतिनिधींना अवश्य कळवाव्यात.

| विभागीय प्रतिनिधी | विभाग व अंतर्गत मंडळे |
|---|---|
| माधुरी जोशी: | न्यू जर्सी, न्यूयॉर्क, अल्बनी, कनेटिकट, हॅरिसबर्ग, डेलावेअर, |
| लीना देवधरे: | टोरांटो, मॉन्ट्रीआल, बफेलो, रॉचेस्टर, न्यू इंग्लंड (बॉस्टन), मिनिसोटा |
| अजय दांडेकर: | लॉस एंजेलिस, सॅक्रमेंटो, सॅन्डिएगो, बे एरिआ, ईस्ट बे एरिआ, पोर्टलॅन्ड, सिॲटल, कॅलिफोर्निया आर्टस् असोसिएशन |
| मिलिंद गोखले: | कोलोराडो, एडमंटन, कॅलगरी, फिनिक्स, वॅनकुअर, कॅन्सास सिटी |
| मंदार जोगळेकर: | फिलाडेल्फिया, पिट्सबर्ग, रॅले, शार्लट रिचमंड (वर्जिनिया), वॉशिंग्टन |
| शाम नवाथे: | ॲटलांटा, टॅम्पा बे, जॅक्सनविल,ओर्लँडो, साऊथ फ्लोरिडा, नॅशव्हिल, मेंफिस |
| कीर्ती रेगे: | सिन्सिनाटी, डेट्रॉइट, नॉर्थईस्ट ओहायो, सेंट लुईस, कोलंबस, मिल्वॉकी |
| दिलीप थत्ते: | शिकागो, पिओरिया, इंडियानापोलिस ऑस्टीन, डलासफोर्ट, ह्यूस्टन |

## अंकासाठी साहित्य पाठवण्याचा पत्ता:

**Email**: vinata@gmail.com **Or**
vpuranik@gmail.com
**For sending paper copy :**
Vinata Kulkarni
6903 N. Buckeye Dr. Edwards, IL 61528

**COMFORT TRAVEL**
ARC **EDISON, NJ** IATA

**COMFORTTRVL@YAHOO.COM**
**Most Trusted name in the business for 15 years.**
**We proudly consolidated for :**
1. **Jet-air, Continental, Kuwait, Emirates etc.**
2. **Non Stop AI Flights to Mumbai special fares**
3. **SOTC, COX & Kings, Trafalgar Tours and Cruises**

**Please Call: SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**

# मराठी मंडळांतून फेरफटका

**फिलाडेल्फिया** भागातील ११ भारतीय मंडळे एकत्र येऊन येथील भारतीय मंदिरात गेली ४ वर्षे १० दिवसांचा गणेशोत्सव साजरा करतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेश चतुर्थीला श्रींची स्थापना होऊन नंतरचे दहा दिवस संध्याकाळी आरती, प्रसाद आणि कार्यक्रम अशा रितीने थाटात उत्सव साजरा झाला. कार्यक्रमात स्थानिक मुले, मुली, प्रौढ कलाकार आणि भारतातील कलाकारांनी भाग घेतला. महेश काळे यांचे गायन, किरण जोगळेकर आणि सहकार्यांचा हिंदी सिने संगीत ऑर्केस्ट्रा, आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावर आधारित 'जुळले नाते मनाशी मनाचे' हा मीना नेरूरकर लिखित आणि दिग्दर्शित कार्यक्रम आणि भारतातील निच एंटरटेनमेंटचा 'ब्लॅक अॅन्ड व्हाईट' हे मराठी कलाकारांचे कार्यक्रम उत्सवात सादर झाले. अनंत चतुर्दशीला 'श्रीं'चे मिरवणूकीनंतर विसर्जन झाले.

**न्यू यॉर्क आणि शिकागो** येथे १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीयांची मिरवणूक निघाली होती. तेथील मराठी मंडळांनी या मिरवणुकीत भाग घेतला होता.

– **मोहन रानडे**

**लॉस एंजलिस** महाराष्ट्र मंडळाच्या गणेशोत्सवास ८०० लोकांची विक्रमी उपस्थिती होती. या समारंभात कै. राजाभाऊ मुळे यांना त्यांच्या नाट्य आणि वाङमयीन क्षेत्रातील कामगिरीबद्दल आणि डॉ. गोपाळ मराठे यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल अत्युत्कृष्ट यशस्विता सन्मान देऊन गौरविण्यात आले.

**सॅन डिएगो** महाराष्ट्र मंडळाचा गणेशोत्सव सुमारे २५० लोकांच्या उपस्थितीत पार पडला. श्रीमती रत्ना कारंडे यांच्या चमूने २५० लोकांसाठी स्वयंपाक करुन त्याचा मंडळाकडून घेतलेला मोबदला (१८०० डॉ) सूसन कोमेन ब्रेस्ट कॅन्सर फाउंडेशनला श्रीमती. कै. राणी धारीया यांच्या स्मरणार्थ देणगी म्हणून दिला.

**सॅक्रमेंटो** महाराष्ट्र मंडळाने आपला पहिला गणेशोत्सव या वर्षी २९ ऑगस्टला साजरा केला. पहिलीच वेळ असल्याने धार्मिक विधींव्यतिरिक्त अतिशय साधेपणाने आणि आपलेपणाने गप्पा मारत हा समारंभ पार पडला.

**फिनीक्स** महाराष्ट्र मंडळाच्या गणेशोत्सवास २७५ लोकांची उपस्थिती होती. सुप्रसिद्ध अभिनेता विजय कदम यांचा 'खुमखुमी' हा कार्यक्रम या समारंभात सादर करण्यात आला.

**ह्यूस्टन** महाराष्ट्र मंडळाने ५०० लोकांच्या उपस्थितीत गणेशोत्सव साजरा केला. या प्रसंगी मंडळाने आपली 'स्नेह' नावाची दैनंदिनी आणि *डिरेक्टरी* प्रकाशित केली. मंडळाच्या नवीन संकेतस्थळाचं प्रकाशनही या प्रसंगी करण्यात आलं.

**डलास फोर्टवर्थ** महाराष्ट्र मंडळाच्या गणेशोत्सवाला ६०० माणसे उपस्थित होती. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात सादर झालेला 'रसरंग' हा कार्यक्रम या समारंभाचं मुख्य आकर्षण होते.

– **वैभव पुराणिक**

**सिन्सिनाटी** त्रिवेणी मित्र मंडळाने ग्रेटर सिन्सिनाटी हिंदू मंदिरात ९७५ मराठी/अमराठी भक्तजनांच्या उपस्थितीत गणेशोत्सव साजरा केला. मुख्य प्रवेशद्वारापासून सभामंडपापर्यंत गणेश पालखीची लेझिम व भजनांसह मिरवणूक व नंतर पूजा आरती झाली. भोजन तयार करण्यास व वाढण्यास मंडळ सभासदांचा पुढाकार होता. मंडळाचे मराठी शाळेचे सत्र १३ सप्टेंबर पासून सुरू होत आहे.

– **कीर्ती रेगे,** त्रिवेणी मित्र मंडळ प्रतिनिधी

# माझ्या वाचनात आलेले

महाजालावर (इंटरनेट) विविध विषयांवर वाचण्याजोगे खूप असते. अगदी अनपेक्षितपणे एखादा लेख आपल्या वाचनात येतो आणि तो इतरांनी जरूर वाचावा असे आपणास वाटते. आपल्या मित्रांना आपण तशी ई-मेल सुद्धा पाठवतो. बृ. म. वृत्ताच्या वाचकांना पण असे चांगले लेख वाचण्याची संधी मिळावी म्हणून हे सदर चालू करीत आहोत. आपल्या वाचनात काही चांगले लेख आले आणि वृत्ताच्या वाचकांना ते आवडतील असे आपल्याला वाटले तर त्या लेखाची महाजालावरील लिंक आम्हाला पाठवा. निवडक लेखांची लिंक/संदर्भ आपल्या नावासह दर महिन्यात प्रसिद्ध करू. गेल्या महिन्यात **Oulook India** साप्ताहिकाने १५ ऑगस्ट निमित्त खास अंक काढला होता. त्यातील आणि इतर नियतकालिकातील काही लेख वाचनीय होते. मला आवडलेल्या काही लेखांची लिंक:

**धार्मिक:** We are all Hindus Now
http://www.newsweek.com/id/212155?GT1=43002

**राजकीय:** भारत पाक संबंध **He who has seen Lahore**
http://www.outlookindia.com/article.aspx?261294

**राजकीय:** भारत आणि भ्रष्टाचार **Our daily bread**
http://www.outlookindia.com/article.aspx?261337

**अमेरिकन झाला भारतीय नागरिक Same Difference**
http://www.outlookindia.com/article.aspx?261314

न्यू जर्सीच्या ईबीसी रेडिओवरून भारतीय संगीत प्रसारित केले जाते. दर शुक्रवारी दुपारी १ ते २ मेधा गवई सादर करत असलेला मराठी गाण्यांचा कार्यक्रम ऐकण्यास खालील लिंकवर भेट द्या. http://radiotime.com/station/s_23875/EBC_Radio_1170.aspx

– **मोहन रानडे**

**www.Laxmiroad.in**

**Buy**

**Chitale Bandhu/RP Vaidya/Kale Sugandhi Products**

as well as **Marathi Books** and

**Get Home Delivery in USA**

**within 4 working days.**

**Log in now or**

**call 91- 020- 25888917**

# स्मरणगंध

काही घटना, हशे, गाणी तुमच्या मनावर कायमचा ठसा उमटवतात. इतकेच काय आतापर्यंत तुम्ही राहत आलात त्या जागा, वास्तू, त्या बास्तूने दिलेल्या आनंदाचा, अनुभवाचा क्षण यासर्वांचा मनाचा एक कोपऱ्यात कायमचा मुक्काम असतो.

नुकत्याच पुण्याहून मला माझ्या मावसबहिणीचा फोन आला. सुस्कारे, रडणे, हुंदके यामधून मला आपले आजोळ संपले एवढेच वाक्य ऐकू आले. मग तिचा रडण्याचा भर ओसरला व गेले ८० वर्ष उभा असलेला, आजोळचा वाडा जमिनदोस्त करुन तेथे नवी इमारत होणार असल्याची माहिती मिळवली. माझे डोळे ओलावले. पण तिच्यासारखे न रडता तिची समजून घालायचा प्रयत्न केला.

जागा जमिनदोस्त झाली. तरी त्या वास्तुने दिलेले प्रेम जिव्हाळा, आठवणी जमीनदोस्त होत नाहीत. आपणच त्या मनाच्या गाभाऱ्यात जपायच्या असतात. फडफडणाऱ्या ह्रुदयाला उबारा द्यायला. ती जमिनदोस्त व्हायला सज्ज होणारी वास्तू– ‘५२९ नारायणपेठ’ हा माझ्या दृष्टीने नुसता पत्ता नाही. ते माझे जन्मस्थान आहे, नव्हे होते. गेले ८० वर्षे उभी असलेली ती इमारत, १०,००० मैलाच्या अंतरावरून पण मनात तशीच जिवंत आहे. मिटल्या डोळ्यापुढे ती सचल होते, तेथे घालवलेल्या अनेक सुट्या, दिवाळीतली धमाल, मे महिन्याच्या सुट्टीतील कानात वारे भरलेले उंडारलेले दिवस. दिवाळी मधील गंमत वेगळीच. मामाच्या दुकानातील लक्ष्मी पुजन त्याला सगळे घरदार जायचे पण आजी मात्र घरच्या लक्ष्मीला दार बंद करायचे नाही म्हणून घरी थांबायची. माझ्याहून थोड्याच मोठ्या असलेल्या मामांनी बांधलेले किल्ले, शेवटच्या क्षणापर्यंत तयार होत असलेले आकाशकंदील व त्या मध्ये मदत म्हणून केलेली लुडबुड, फराळाच्या पदार्थांची रेलेचेल, आजोबांच्या देखरेखी खाली बनवले गेलेले बुंदी आणि मोतीचुराचे लाडु तेव्हा फारसे आवडले नाहीत पण आता त्याची आठवण येते.

दिवाळी संपल्यावर मे महीन्याचे वेध लागत. मामाचे आंब्याचे दुकान– घरातच तिसऱ्या मजल्या वरच्या पोटमाळ्यावर अडगळी बरोबर आंब्याची आढी! आजी बरोबर वर जाऊन आंबे वर खाली करून, टोपली भर आंबे आणून आजीचा मुक्काम मागच्या अंगणात असे.

आजीची मैत्रीण असलेल्या करड्या स्वभावाच्या मालती बाईंची घारी नजर चुकवून झाडावर चढायचे प्रयत्न, वाड्यातील मुले व इतर घरातील माझ्यासारखी नातवंडे, त्यांच्या बरोबर खेळलेले विटीदांडू, लगोऱ्या, फिरकीचा भोवरा, वैदल आणि गोव्या. वारा भरलेल्या वासरा सारखी उंडारणारे आम्ही सर्व आणि निर्बंध आनंदाचे ते रम्य दिवस.

काळजी करणाऱ्या आजी व कडक आजोबांची नजर चुकवून शिकलेली सायकल, भानुविलास आणि विजय टॉकीजला पाहिलेले मराठी सिनेमे, आजी बरोबर दर्शन घेतलेले मोदी, चिमण्या, उंबऱ्या अशा नावाचे गणपती उपाशी, केसकर, शेडगे या नावाची विठोबाची देवळे, देवीची देवळे, किर्तने, काकडा आरती असे समृध्द जीवन मला या वास्तूने दिले.

माझ्या मामाच्या लग्नातील वरातीनंतरचे गृह प्रवेश, मोठ्या घरात प्रवेशणाऱ्या बावरलेल्या नव्या सुनेला सावरणारी घरातील लहान थोर मंडळी एकत्र कुटुंबात राहण्याचे प्रशिक्षण देत होते मला!

आमच्या लग्नानंतर आमचे नवे जोडपे याच वास्तूत प्रथम नमस्काराला गेले. माझ्या मुलीच्या जन्मानंतर आमच्या चार पिढ्यांचे फोटो काढायला मी तेथे गेले. मुलगे झाल्यावर पणतु दाखवायलाही तेथे माझ्या आजी आजोबां कडे गेले. पणती, पणतु दाखवणे ही निमीत्ते, पण खरं म्हणजे माझा जन्म ज्या खोलीत झाला त्या जमिनीला हे सांगण्याची ऊर्मी की ‘मी येथे जन्मले, आता माझ्या वाढलेल्या वंशाला तुझ्या पायावर घालायला आणले आहे.’

अंगणातील डवरलेल्या भरगोस तुळशी सारखे, नांदत्या गोकुळा सारखे मुलं, सुना, नातवंडांचे घर असलेली ती वास्तू पानशेतच्या पूरातही टिकली, तग धरून राहिली.

माझ्या आजी आजोबांच्या पश्चात तेथे राहणाऱ्या दोन मामा आणि मामींनी ते घर, तेथील संस्कार आणि आदरातिथ्य जपले आणि मामीच्या पश्चात तिच्या हाताखाली तयार झालेली तिची सून तोच वसा चालवत आहे. आता पुन्हा होणाऱ्या भारत भेटीत जरी ‘५२९ नारायण पेठ’ लाक्षणिक अर्थाने संपले तरी माझ्या मनातील त्या वास्तूच्या प्रतिमेवर कोणीच घाला घालू शकत नाही.

**ज्योत्स्ना ओगले,** टोरांटो, कॅनडा

(No email-id, phone: ४१६–७६३–२११०)

**या दिवाळीत भेट देण्यास नवीन डीव्हीडी**

**तीन डीव्हीडी ऑर्डरबरोबर चार सुंदर दिवाळी कार्ड मोफत**



२००९ सालचा सर्वात गाजलेला चित्रपट **मी शिवाजीराजे भोसले बोलतोय**



विजय तेंडुलकर यांचे गाजलेले नाटक **शांतता कोर्ट चालू आहे**



**चित्रपट सखी** अशोक सराफ, सुबोध भावे, किशोरी गोडबोले, मकरंद अनासपुरे



गेल्या वर्षी झी टीव्हीवर सर्वात गाजलेला कार्यक्रम — **लिट्ल चॅम्प्स**



आता ३ डीव्हीडींवर उपलब्ध



**चित्रपट सत्य** मोहन जोशी, पुष्कर जोग, रविंद्र मंकणी, रेश्मा टिपणीस, संगीत – आनंद मोडक

प्रत्येक डीव्हीडी १० डॉलर्स अधिक शिपिंग

ऑर्डर करण्यास फोन करा २१५–३५४–१४२३

**नीलम ऑडिओ–व्हिडिओ www.neelam.com**

# योग शास्त्र लेख क्र.१

**आरोग्य म्हणजे काय, आरोग्याची व्याख्या:** साठ सत्तर वर्षापूर्वी आरोग्य म्हणजे काय प्रश्नच विचित्र वाटला असता. काही होत नाही म्हणजे आरोग्य. पण १९५० नंतर वर्ल्ड हेल्थ ऑर्गनाईझेशन ह्या संस्थेने शारिरीक व मानसिक स्वास्थ्य (Physical & Mental Well being) म्हणजे आरोग्य अशी व्याख्या केली. पण चेंगीझखान किंवा हिटलर ह्यांसारख्या व्यक्तींना जरी शारिरीक व (तथाकथित) मानसिक स्वास्थ्य होतं तरी समाजात त्यांनी पराकोटीचे अस्वास्थ्य निर्माण केले. आणि म्हणून त्यानंतर आरोग्याच्या व्याख्येत 'सामाजिक स्वास्थ्य' (Social Well being) ही भर घातली गेली. १९९० च्या दशकात मात्र एका भारतीय शास्त्रज्ञाने असा प्रश्न विचारला की वरील व्याख्या जर मान्य केली तर मग जनावर आणि मानव ह्या दोघांत फरक काय? कारण घोडागाडीला जुंपलेल्या चार घोड्यांना शारिरीक, मानसिक स्वास्थ्य असून ते एकमेकांच्या सहकार्याने गाडी ओढतात म्हणजे त्यांच्या अंगी सामाजिक स्वास्थ्यही आहे. मग त्यांच्यात आणि माणसात फरक तो काय? खूप चर्चेनंतर 'अध्यात्मिक स्वास्थ्य' (Spiritual Well being) ही आणखी एक महत्वाची भर आरोग्याच्या व्याख्येत घालण्यात आली.

वास्तविक 'स्वस्थ' आणि 'अस्वस्थ' अशी थोडक्यात आरोग्याची व्याख्या आपण रोजच्या व्यवहारात वापरतो. ह्या दोन शब्दांमध्येच आरोग्याचा गर्भितार्थ आहे. आपल्या प्रत्येकाची एक वैयक्तिक 'संतुल' स्थिती असते. जेव्हा आपण शरीराने व मनाने शांत असतो तेव्हा आपल्याला ह्या स्थितीची जाणीव होऊ शकते. 'स्व' म्हणजे 'स्वतःच्या' आणि 'स्थ' म्हणजे 'संतुल स्थिती'; स्वस्थ असणे म्हणजे आपल्या 'संतुल' स्थितीत असणे. जेव्हा ही 'संतुल' स्थिती बिघडते तेव्हा आपण 'अस्वस्थ' होतो म्हणजेच आपल्या नैसर्गिक संतुल स्थितीपासून दूर जातो. आपली संतुल स्थिती शारिरीक, प्राणिक, मानसिक, वैचारिक, अशा विविध स्तरात असते. जेव्हा ती बिघडते तेव्हा ती एक किंवा एकापेक्षा जास्त स्तरात बिघडू शकते. हे बिघडलेले संतुलन परत योग्य स्थितीत आणण्याचे मार्गदर्शन तसेच, रोजच्या जीवनात वैयक्तिक संतुलत्व टिकविण्याची गुरुकिल्ली आपल्याला योगशास्त्राचा अभ्यासात मिळू शकते.

**योगशास्त्राचे प्रमुख विभाग:** योगशास्त्राच्या संदर्भात तीन प्रमुख ग्रंथ डोळ्यासमोर येतात: योगवासिष्ठ, श्रीमद्भगत् गीता, आणि पतंजल योगसूत्र. हे तीनही ग्रंथ जरी निरनिराळ्या कालखंडातील असले तरी ह्या तीनही ग्रंथामधील 'मनोनिग्रह' ह्या विषयी आढळणारी एकसूत्रता उल्लेखनीय आहे. गीतेत पहिल्या पाच अध्यायात भगवंताने अर्जुनाला योगशास्त्राची रूपरेषा समजाऊन सांगितल्यावर सहाव्या अध्यायात शेवटी अर्जुन भगवंतास म्हणतो 'बाबारे, तू मला मनोनिग्रह करण्यास सांगतो आहेस खरा पण हे मन नुसतेच चंचल नाही तर ते खट्याळ, बलवान, आणि निश्चयी असे आहे. वारा एक वेळ थोपवून धरणे शक्य होईल पण मनोनिग्रह त्याहीपेक्षा दुरापास्त आहे. त्यावर भगवंताने अर्जुनाचे म्हणणे निःसंशय मान्य केले. परंतु मनोनिग्रह दुरापास्त असला तरी अशक्य नसून 'अभ्यास' आणि 'वैराग्य' ह्या मार्गांनी मनोनिग्रह आत्मसात करता येऊ शकतो असे सांगून पुढे हा विषय विस्ताराने सांगितला. पतंजली योगसूत्राच्या दुसऱ्याच सूत्रात 'चित्तवृत्ती निरोध:' हा 'योगशास्त्राचा' मूळ गाभा पतंजली मुनी थोडक्यात नमूद करतात.

भगवंताने 'अभ्यास' आणि 'वैराग्य' हे योगशास्त्राचे दोन प्रमुख मार्ग सांगितले. त्यानंतर ह्या मार्गांचे प्रत्येकी दोन प्रमुख विभाग ते विस्ताराने सांगतात. 'अभ्यास' मार्गात 'राजयोग' आणि 'कर्मयोग' हे दोन विभाग व 'वैराग्य' मार्गात 'ज्ञानमाग'' आणि 'भक्तिमाग'' हे दोन विभाग होत. पुढे पतंजली मुनींनी योगशास्त्राला अधिक मूर्त स्वरूप दिले. विशेषकरून राजयोगाचा अभ्यास रोजच्या जीवनात कसा करावा हा विषय विस्ताराने सांगितला. हाच राजयोग आज आपण 'अष्टांगयोग' ह्या नावानेही ओळखतो. ह्या मार्गाचा अभ्यास करताना यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, व समाधी ह्या आठ पायऱ्या नसून ही आठ अंग आहेत हे पूर्णपणे ध्यानात ठेवावे. आठही अंगांचा अभ्यास (निदान सहा तरी, ध्यान आणि समाधी ह्या दोन्ही अंगांचा अभ्यास करणे सर्वसामान्यत: कठीण आहे) सातत्याने करणे महत्वाचे आहे लक्षात ठेवावे. ह्या राजयोगाच्या म्हणजेच अष्टांगयोगाच्या अभ्यासाने व स्वप्रयत्नाने स्वत:वरच प्रभुत्व प्रस्थापित करू शकणे व म्हणून त्याचे नांव 'राजयोग'('स्वत:चेच स्वत: स्वामित्व') असे थोडक्यात सांगता येईल.

तैत्तरीय उपनिषदात जीवनास आवश्यक असणाऱ्या पांच स्तरांचा उल्लेख आहे. ह्या 'पंचकोश' तत्वाचा विचार पुढील वृत्तात करूया.

**शरद दांडेकर**, लॉस एंजेलिस
***sdandekar2000@yahoo.com***



One man's 5000-mile motorcycle journey through South America
Available online only on: www.amazon.com
www.barnesandnoble.com
www.iuniverse.com

## Tequila टकाटक! पुस्तक परिचय





मराठी जनांनी प्रवेशमूल्य देऊन आपले लेख या पुस्तकासाठी पाठवले आहेत असं कळलं म्हणून हे पुस्तक मोठ्या उत्सुकतेने हातात घेतलं. हातात घेतल्यानंतर मात्र एकामागून एक आश्चर्याचे सुखद धक्के बसतच राहिले. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळ्यातून समजलेली या पुस्तकाची जन्मकथाही तितकीच मजेदार निघाली. डॉ. भूषण केळकर यांनी ग्रंथालीतर्फे एक स्पर्धा घेऊन जगभरातल्या अनिवासी मराठी जनांना आपआपल्या आवडत्या विषयावर प्रक्षोभक पण कुत्सित नसणारे, विचार प्रवर्तक तरीही आग्रही मते मांडणारे असे लेख पाठवायचं आवाहन केलं. ३९ देशातून आलेल्या १२८ लेखांमधून अविनाश धर्माधिकारी, सुधीर गाडगीळ आणि अपर्णा वेलणकर या त्रयीने ४५ लेखांची निवड केली आणि त्यातूनच या पुस्तकाची जन्म झाला. स्पर्धकांचे काही लेख इंग्रजीमधून मराठीत मंजिरी धामणकर यांनी अनुवादीत केले आहेत. शब्दशः अनुवाद न करता स्वैर अनुवाद केल्याने ते प्रभावी झाले असून अनुवादित लेख ओळखता येत नाहीत. स्पर्धकांच्या लेखाव्यतिरीक्त अश्विनी भावे, जगन्नाथ वाणी, सिंगापूरचे बल्लवाचार्य मिलिंद सोवनी अशा काही निमंत्रितांचे लेखही या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहेत.

जगभरच्या अनिवासी मराठी जनांच्या या लेखन स्पर्धेत उत्तर अमेरिकेतील मराठी जनांनीही हिरीरीने भाग घेतला. अमेरिकेतून आलेल्या लेखांमध्ये शुभा गोळवलकर यांनी आपल्या मुलीच्या प्रॉमची गोष्ट रंजकपणे सांगितली आहे. कॅलिफोर्नियाच्या नीरज पेंडसे यांनी आपले खाजगी विमानोड्डाणाचे रोचक अनुभव सांगितले आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा माधुरी जोशी यांनी मराठी लोकांची नेटवर्किंगविषयीची अनास्था कळकळीने मांडली आहे. अमेय भट या अमेरिकेत जन्मलेल्या मुलाने अमेरिकन की इंडियन या प्रश्नाचे उत्तर आपल्यापुरतं शोधायचा प्रयत्न केला आहे. डॉ. प्रियदर्शन मनोहर यांनी 'संस्कृतीची ऐशीतैशी' या आपल्या लेखात भारतातली मूळ संस्कृती बदलत असून अनिवासी भारतीयांची संस्कृती कशी थिजली आहे हे दाखवून दिले आहे. मधुरा गोखले यांनी इ-प्रसारणच्या जन्माची कथा सांगितली आहे. प्रकाश वाघमारे यांनी होमलँड सिक्युरिटीचा आपला अनुभव मांडला आहे. एका अनामिकेने तर इंपोटन्सी या विषयावर मोकळेपणाने लिहीले आहे. नवरा इंपोटंट असल्यामुळे होणाऱ्या एका स्त्रीची व्यथा प्रभावीपणे मांडली आहे. हा लेख लिहिल्याबद्दल आणि तो निवडल्याबद्दल लेखिका आणि संपादक मंडळ विशेष कौतुकास पात्र आहेत. या व्यतिरिक्त विजया बापट, अरविंद नारळे, राही कर्णिक, अमित भावे अशा अनेक उत्तर अमेरिकेतील लेखकांचे लेखही वाचनीय आहेत.

अमेरिकेबाहेरील अनिवासी भारतीयांच्या लेखांमध्ये मंजिरी कारुळकर यांचे उझबेकीस्तानातले अनुभव, सिंगापूरच्या मिलिंद सोवनींचे अनुभव, बोटस्वानातील शैलजा गोगटे आणि मॅंगोलियातील प्रभाकर साठे यांचे लेख वाचनीय आहेत.


प्रत्येक माणसात एक लेखक दडलेला असतो असा ग्रंथालीच्या दिनकर गांगलांचा विश्वास अनिवासी मराठी जनांनी सार्थ करुन दाखवला आहे. अशा प्रकारच्या उपक्रमामुळे अनिवासी मराठी जनांचा वेगळा दृष्टीकोन, त्यांचे प्रश्न आणि समस्या आणि त्यांचे रंजक अनुभव सर्व मराठी लोकांपुढे मांडले गेले आहेत. विषयाच्या वेगवेगळेपणामुळे आणि दर्जाचं भान राखून निवडलेल्या लेखांमुळे या पुस्तकाची गणना केवळ आणखी एक 'एन आर आय' पुस्तक अशी होणार नाही याचा मला विश्वास वाटतो. अशा प्रकारचा उपक्रम यशस्वीरित्या केल्याबद्दल डॉ. भूषण केळकर आणि ग्रंथालीचे अभिनंदन!

**वैभव पुराणिक**
***vpuranik@gmail.com***





**'मॉम्स किचन' पुस्तकाची नवीन आकर्षक आवृत्ती**

**प्रकाशक - बृ. मंडळ उत्तर अमेरिका**
इंग्रजी भाषेत, विविध प्रकारच्या २५० पाककिया आणि उपयुक्त माहितीसह
किंमत - २० डॉलर्स (शिपिंगसह)




**फॉर हिअर ऑर टू गो**— लोकमत दैनिकाच्या रविवार पुरवणीच्या संपादिका आणि लेखिका अपर्णा वेलणकर यांच्या गाजलेल्या पुस्तकाची चौथी आवृत्ती आता उपलब्ध. चार दशकांपूर्वी महासागर ओलांडून उत्तर अमेरिकेत आलेल्या मराठी माणसांच्या देशांतरा-ची कहाणी. किंमत - १५ डॉलर्स (शिपिंगसह)




**My Marathi -** Marathi educational tool created by Hemangi Joshi-Deodhar. This is an interactive CD-based Marathi learning tool for English speakers who want to learn Marathi. Two CD covers Culture, Grammar, Vocabulary and Conversations.
Price $35 (includes shipping)

ऑर्डर करण्यास संपर्क: समिता रानडे
फोन - (२१५) ३५४-१४२३ *e-mail - brihanmm@gmail.com*

१९९४ साली बृहन्महाराष्ट्र मंडळाने सुप्रसिद्ध गायक श्रीकांत पारगांवकर आणि अनुराधा मराठे यांचा दौरा आयोजित केला होता. श्रीकांत पारगांवकर सध्या तलत महमूद यांच्या गाण्यांचा कार्यक्रम सादर करतात. त्यांची नवीन वेबसाईट: www.shrikantpargaonkar.com याला अवश्य भेट द्या.

# 'मेघ जे तरळून गेले' ..

*वाळवंटी या जरासे मेघ जे तरळून गेले*
*आटलेल्या ह्या नदीचे स्वप्न ते हुरळून गेले*

मयूर देवल यांच्या लेखणीतून उतरलेल्या या गीताला तरुण संगीतकार मनीष भांड यांनी संगीत दिले असून बेला शेंडे यांचा सुरेल स्वर लाभला आहे.

"मनमोर" या फाऊंटन म्युझिक कंपनीने वितरित केलेल्या नवीन सीडीमधल्या ९ गीतांपैकी हे एक गीत. या सीडीवरची सर्व गाणी मयूर देवल यांनी लिहिली आहेत. यातील आठ गाणी मनीष भांड यांनी संगीतबद्ध केली असून, एका गाण्याला विनय राजवाडे यांचे संगीत लाभले आहे. गाणी गायली आहेत बेला शेंडे, स्वप्नील बांदोडकर या महाराष्ट्रातल्या आजच्या आघाडीच्या गायकांनी. तसंच रिचा शर्मा यांच्या आवाजात सूफी गायकीचा बाज असलेले एक गीत 'खास भेट' म्हणून सादर केलं आहे.

सीडीमध्ये सुरवातीलाच *'या ना चला ना मस्त हा साल्सा करायला'* अशी साद घालणारं हलकंफुलकं द्वंद्वगीत आहे. गीताच्या शब्दांना शोभेल अशी उडती चाल आणि वाद्यांची जोड या गाण्याला आहे. या पहिल्याच गाण्याचा मूड थोडाफार सांभाळणारं बेला शेंडे आणि स्वप्नील बांदोडकर यांच्या आवाजातलं अजून एक सुरेख गीत म्हणजे *'निघून दूर जाऊ नको'* असं आर्जवाने विनवणाऱ्या त्याला *'हसून वाट रोखू नको'* असं सांगणारी ती या दोघांतला संवाद.

मयूर देवल यांचीच गीतं असलेल्या "साजणा" या सीडीवरचे 'येते जाते, जाते येते वाऱ्याची लकेर' हे गीत "मनमोर" मध्ये नवीन अंतरे आणि वेगळ्या चालीत समोर येतं. संगीतकार मनीष भांड या गीताच्या शब्दांना योग्य न्याय देण्यात यशस्वी झाले आहेत. *'आज का ह्या जीवनाचा अर्थ लागे वेगळा'* आणि *'कुंतल हवेत सळसळता'* ह्या दोन गाण्यावर अलिकडच्या हिन्दी संगीताचा प्रभाव वाटतो तरीही ही दोन्ही गाणी श्रवणीय झाली आहेत. *'आज का या जीवनाचा...'* हे गीत म्हणून सुंदर आहे तसंच *'तो नभातुनी भरारतो..'* हे गीतसुद्धा चांगले जमले आहे. याच्या वेगवान चालीमुळे गाण्यात मात्र काही शब्द हरवून जातात असं वाटतं.

सुरवातीला उल्लेख केलेलं *'वाळवंटी या जरासे...'* ही गझल एक गीत म्हणून, दिलेलं संगीत आणि गायन या तिन्ही बाबतीत हे उत्कृष्ट झाले आहे. शब्दसौंदर्याचं उदाहरण द्यायचं झाल्यास

*कोरड्या होत्या सरी, अंगार अन माथ्यावरी*
*मृगजळाच्या पावसाने मात्र मी निथळून गेले*

ही द्वयी देता येईल. संपूर्ण गीत, संगीत आणि गायनासह या गाण्याचा पूर्ण आस्वाद घेण्यासाठी मात्र ते ऐकलेच पाहिजे!

*'रात्र थोडीशी शहाणी'* हे गीत दोन गायिकांच्या सुरात ऐकायला मिळते. बेला शेंडे यांनी गायलेल्या गीताला मनीष भांड यांचे संगीत आहे. तसेच शेवटी "खास भेट" म्हणून ते रिचा शर्मा यांच्या आवाजात सादर केले आहे. ह्या गीताला विनय राजवाडे यांचे संगीत आहे. रिचा शर्मा यांनी या गाण्याच्या सुरवातीचा दोहा अप्रतीम गायला आहे. नंतरचे संथ लयीतले गीतही सुरेल आणि श्रवणीय आहे. ( ..कृपया पृष्ट ९ पहा)

# भारतभेटीतील मास्को नाट्य

शाळेत जायचा हट्ट धरून आईची नजर चुकवून एका गोंडस piglet चा पाठलाग करत मी (वय वर्षे २॥) घरापासून पायी पाच मिनिटे अंतरावर असलेल्या बालवाडीच्या वर्गात पोहोचले देखील. तेव्हढ्यात हवाई कर्मचाऱ्याने *'we are getting ready to land at Chatrapati Shivaji International Airport,* मुंबाय. *All passengers, along with your immigration forms, please fill up a form given to you on a flight detailing medical and travel history. With this information, the medical team is conducting tests on those who indicate swine flu symptoms.'* अशी घोषणा केली; आणि मी अर्धवट झोपेतून जागे झाले. रात्रीचे ११ वाजलेले! विमान प्रवासात खायचे, प्यायचे, आणि भरपूर झोपायचे, पुस्तक, ऑडिओ, व्हिडिओ, सर्व बंद– त्यामुळे मुंबईस पोहोचल्यावर पुढे पुणे वा अन्यत्र प्रवास पार पडेपर्यंत जाग्रण होऊनही घरी पोहोचल्यावर जेटलॅगने तो दिवस वाया जात नाही– हा माझा जेटलॅग टाळण्यासाठी स्वत:पुरता तोडगा. लहानपणी मी piggy बाळाचा पाठलाग केल्याची घटना इतक्यावर्षाने आत्ता स्वप्नात यावी याचे एकीकडे आश्चर्य आणि आता या फ्लूला कारणीभूत एका 'स्वाईन'च्या करामतीस तोंड देण्यासाठी अमेरिकेहून भारतात येण्याची मला का बरें दुर्बुध्दी सुचली? असाही प्रश्न मनात आला.

विमानतळावर आरोग्य अधिकाऱ्यांनी माझे कागदपत्र चाळले आणि मी domestic flights च्या Terminal ला पोहोचले. नागपूरच्या flight ला ७ तास बाकी होते. बहुतेक प्रवासी मंडळी पेंगुळलेली आणि एक-एक व्यक्ती २-२ आसनांवर लवंडलेली. १०-१५ मिनिटे इकडे तिकडे फिरून, कॉफीने ताजेतवाने होत मी तेथेच एका कोपऱ्यात पॉवर- प्लग- इन सॉकेट शोधून काढले. एकही खुर्ची रिकामी दिसेना, तेव्हा तेथल्या फर्शीवर मांडी घालून बसत माझा लॅपटॉप/संगणक पुढ्यात घेतला. तेथून जाणाऱ्या, येणाऱ्यां भारतीयांच्या कुतूहलाच्या नजरा दुर्लक्षून मी कामात लक्ष घातले. जरावेळाने 'madam, do you need a chair' -समोरच्या माहितीकक्षातील मुलाने पळत येऊन विचारणा केली. 'No, Thanks मी उत्तरले. त्याच्या आतिथ्याचे कौतुक, आणि फर्शीवर मांडी घालून बसणे ही बाब आता भारतीय शिष्टाचारात मागासलेपणाची झाली का? असाही प्रश्न मनात आला. तेव्हढ्यात ॲमस्टरडॅम – मुंबई विमानात माझे सहप्रवासी असलेले एक अमेरिकन जोडपेही माझ्या पलिकडे येऊन बसले. स्वाईन फ्लू व *travel history* बद्दल विमानतळावरील आरोग्य अधिकाऱ्यांनी उलट सुलट असंख्य प्रश्न विचारल्यामुळे ते दोघे वैतागले होते. दोघांनीही activated carbon filter mask स्वत:च्या नाकातोंडावर चढवला होता. ताबडतोब मिळेल ती परतीची अमेरिकेची फ्लाईट घ्यावी की ठरल्याप्रमाणे जयपूरची याबद्दल त्यांचा वाद चालू होता. माझे मत अजमावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'Well, I'm not changing my travel plan, but I will take preventive measures'. मी उत्तरले. काही तासाने एकमत होऊन जोडी boarding gate कडे रवाना झाली. तेवढ्यात अंगभर काळा बुरखाधारी महिलेने पलिकडे खाली फर्शीवर शाल अंथरली आणि ती व तिच्या पतीने नमाज प्रार्थना सुरू केली.

मनात आले, निदान त्या काळ्या बुरख्याचे सार्थक झाले. स्वाईन फ्लू विरोधात वेगळा mask नाकातोंडावर चढवायची तिला गरज नाही! एकंदरीत संगणकावरील कामात माझे लक्ष नव्हते. प्रवासाचा कंटाळाही आला होता. विमानतळासारख्या सार्वजनिक ठिकाणी नमाजासाठी बैठक मांडून प्रार्थना करणे जनतेला चालते तेव्हा, आळस जाण्यासाठी आपणही तेथे पद्मासन आणि प्राणायाम केले तर? असाही एक खोडकर विचार मनात आला. असो. अखेर माझे मुंबई –नागपूर flight चे बोर्डिंग सुरू झाले. एक बरे, की पुढच्या मार्गावर, प्रवासात, विमानतळांवर, मुक्कामात कोठेच ‘स्वाईन’ फ्लूबद्दल साधी चर्चाही नव्हती.

४ दिवसांनंतर पुण्यात पोहोचले आणि विश्वासच बसेना. सभोवताली, रस्त्यांवर, सर्वत्र सुमारे ९०टक्के लोकांचे नाक, तोंड रुमालाने वा मास्कने झाकलेले. माझ्या घराशेजारीच राहणाऱ्या बहिणीकडे गेले. स्वाइन फ्लूचा फैलाव टाळण्यासाठी शाळेला सुट्टी असल्यामुळे माझा किशोरवयीन भाचा आनंदी होता. पण दिवसभर घरात रहावे लागत असल्यामुळे टीनएजर भाच्याला कंटाळा आला होता. दूरदर्शनवरील बातम्या ऐकून, क्रिकेट सामन्यातील commentary प्रमाणे, ‘आता आपले इतके खेळाडू बाद’ अशा सुरात, ‘पुण्यात या घटकेला स्वाईन फ्लूचे इतके बळी’ .. असे updates’ तो वारंवार मला देऊ लागला.

“ घरात केवळ एक डास असला तरी नेमका तो तुला चावतो, आणि ५० फूट दूर कोणी शिंकले तरी तुझे नाक हुळहुळते” तेव्हा नाकांतोडांला मास्क लावल्या शिवाय घराबाहेर पडायचे नाही.” व्यवसायाने डॉक्टर असलेल्या माझ्या बहिणीने मला ताकीद दिली. निमूटपणे, घराजवळच्या केमिस्टकडे मी ‘मास्क’ विकत घेण्यास गेले. ‘काय ताई, यावेळी अमेरिकेहून स्वाईन फ्लू आणलांत? ‘कुठला मास्क देऊ ? १२ रुपये वाले सगळे खलास!’ ( ‘मास्क की माणसे खलास ?’– माझा स्वगत प्रतिप्रश्न!) ‘सर्जिकल, एच १ एन् १ मास्क घ्या! एकदम पॉवरफुल’ अशी त्याची सेल्समनशिप टकळी सुरू. ‘दे त्यातले सहा मास्क’ असे मी म्हणताच ‘काय मुलं, साहेब आणि कोणी आलीयत का?’ ही वर चौकशी! ‘नाही रे, घर कामाला येणाऱ्या दोघी बाईंना, कार ड्राइव्हरला आणि अजून कुणाला कामी येतील ते मास्क!’ मी उत्तरले.

“ मावशी, यावेळी –तू नेहेमीप्रमाणे बदाम, पिस्ते इत्यादी खाऊ न आणता, टॅमी फ्लूच्या गोळ्या आणायला हव्या होत्या. अमेरिकेने पाठवलेल्या टॅमी फ्लूच्या गोळ्या मुंबई विमातळावरून अचानक गायब झाल्या अशी बातमी दूरदर्शनवर होती.” इति माझा भाचा.

दुसऱ्या दिवशी घराजवळच्या बँकेत कामासाठी गेले. ATM बंद असल्यामुळे तेथे प्रत्येक कौंटरवर प्रचंड गर्दी. सगळीकडे मास्कनशीन मंडळी बघून रांगेमधे माझ्या मागे उभ्या असलेल्या महिलेचा सुमारे ४ वर्षाचा मुलगा ‘आपल्या टी व्हीवर पाहिले तसे या बँकेत एवढे दरोडेखोर आलेतं का?’ असं आईला विचारत होता. पण त्याउलट, बरीचशी मोठी माणसे मात्र मास्क **न** लावणाऱ्यांकडे ते ‘biochemical terrorist’ असावीत या शंकेने किंवा साधी शिंक वा खसा साफ करण्यासाठी खोकले तरी त्या व्यक्तीला स्वाईन फ्लू झाला असावा अशा संशयाने बघत होती.

मास्कचे विविध प्रकार, पोत, रंग यातही अनेकांचा status symbol प्रदर्शित होत होता. पुण्यातच खरेदी केलेली साडी नेसून गेले तरी ‘काय, ही अमेरिकेची खरेदी का?’ असे विचारणारी माझी मित्रमंडळी, नातेवाईक, यंदा पुण्यातच खरेदी केलेला माझा मास्क बघून, ‘तुझा मास्क स्पेशल दिसतोयं, अमेरिकेहून आणलास का?’ असं विचारू लागली. ‘एच १ एन् १ मास्क, टॅमी फ्लू गोळ्या.. इत्यादींपेक्षा रामबाण उपाय–निलगिरी तेलात रुमाल भिजवून नाकातोंडावर बांधा!’– एका ऑटोरिक्षाचालकाने मला घरगुती औषधी मंत्र दिला. पूर्वी पुण्यात प्राध्यापकी नोकरी करत असतांना १५ ऑगस्टला आम्हा प्राध्यापकांना ध्वजवंदनासाठी पांढरा गणवेश असे. अजूनही ती प्रथा आहे. यंदा ऑगस्टमधे महाराष्ट्रात प्राध्यापकांचा संप होता. वेतनवाढ न करणाऱ्या सरकारच्या निषेधार्थ प्राध्यापकांच्या हाती काळे झेंडे असले तरी, देशभक्तीमधे कसूर नको म्हणून, यंदा १५ ऑगस्टदिनी, ध्वजवंदनाचेवेळी नाकातोंडाला तिरंगी मास्क लावावा’ असा देशभक्ती/cum आरोग्यपूर्ण 2 in 1 सल्ला मी संपावर असलेल्या माझ्या एका प्राध्यापिका मैत्रिणीला दिला. एकंदरीत सर्व पुणेकर स्वाईन फ्लू संसर्ग पसरू नये या हेतूने आपापल्यापरीने डोके लढवत होते. गर्दी, सार्वजनिक उत्सव, ठिकाणे टाळत होते. पण त्यामानाने मुंबईकर बिनधास्त! स्वाईन फ्लू व तमाम जनतेच्या भविष्याची चिंता ‘गोविंदा’वर सोपवून हजारो प्रेक्षकांच्या गर्दीत २५ लाख रुपये बक्षिसाचा दहीहंडी उत्सव मुंबईत उत्साहाने झालाच!

अमेरिकेस परतीचे मला वेध लागले. पुण्यात ठरविलेली पुस्तके, वस्तूंची खरेदी, काही सार्वजनिक समारंभ यातील बरेचसे बेत रद्द करावे लागले. ‘आई, मी सांगितलेले सर्व ड्रेसेस, खरेदी केलेस का?’ असे मुलीने अमेरिकेतून फोन वर विचारल्यावर, ‘सर्व खरेदी करणे जमले नाही पण Memento स्वरूपी एक spare मास्क आहे.’ मी उत्तरले. परतीच्या प्रवासात मुंबई विमानतळावरच अमेरिकेचे कस्टम्स, इमिग्रेशनवाले, स्वाईन फ्लू संसर्ग परिसरातून आलेल्या पुणेकरांना अडवतील, कसून आरोग्य तपासणी करतील हा माझा अंदाज! पण तसे घडले नाही. विमानाने ‘टेक ऑफ’ केले आणि मी नाकातोंडाच्या मास्कमधून स्वत:ची सुटका करण्याचे ठरवले. पण छे! मुंबई–अॅटलांटा अखंड प्रवासात, नेमके माझ्या शेजारच्या आसनावरील सहप्रवासी चौफेर आवासून निर्बंध खोकत होता व पलिकडे बसलेली महिला सर्दीने हैराण होती. एकंदरीत ‘स्वाईन’ माझ्या खरोखरीच मागावर आहे की काय? अशी शंका येऊ लागली. पण बहुदा, ‘औषधे चिंतये विष्णुम्....प्रवासेच त्रिविक्रमम्’ ह्या बालपणी माझ्यावर झालेल्या संस्कारांमुळे भगवान् विष्णुच्या ‘वराह’ अवताराची ऊर्फ स्वाईनची माझ्यावर अवकृपा झाली नसावी. अॅटलांटा–शिकागो प्रवासात हाती पडलेल्या वृत्तपत्रात ठळक बातमी होती– ‘स्वाईन फ्लू संसर्ग होऊन काही दिवस कोमामधे असलेली महिला देखील डॉक्टरांच्या योग्य उपचारांनी बरी!’ अमेरिकेत घरी पोहोचले आणि मास्क disposable bag मधे नजरेआड टाकून हुश्श करत मी मोकळ्या हवेत श्वास घेतला!

**विनता कुलकर्णी** ***( vinata@gmail.com )***

# शेवटचे पान

महाराष्ट्रातच गणेश उत्सव धुमधडाक्यात साजरे होतात असे नव्हे तर सध्या जगभर जेथे मराठी समाज स्थायिक झाला आहे तेथे गणेश उत्सव हमखास होतोच. २५–३० वर्षांपूर्वी परदेशातील अनेक मराठी मंडळांच्या स्थापनेला गणेश उत्सवानेच सुरूवात झाली. भारतात ज्यांचे घरी गणपती बसत असे अशा लोकांचे आई वडील त्यावेळी अमेरिकेत आले असले तर घराण्यातला नेम मोडायला नको म्हणून अमेरिकेतील मराठी घरांतून गणपती बसू लागले. आई वडील परत गेले तरी पार्टी करायला गणेश उत्सव हे आणखी एक चांगले कारण आहे असे वाटून अशा घरी गणेशाची स्थापना चालूच राहिली. अल्ट्रा मॉडर्न वाटणारी आमची एक मैत्रीण "तेवढेच घरात काहीतरी रिलिजस होते गं ! याला (म्हणजे नवऱ्याला) रिलिजनबद्दल अजिबात काही नाही. आपल्यालाच (म्हणजे बायकांना) सगळ्याचा विचार करायला लागतो नाही का ? शिवाय मुलांना पण जरा आपले कल्चर दाखवता येतं" असा विचार करीत तिच्या घरी गणपती बसू लागला. "तुझं अगदी बरोबर आहे हं" पार्टीला जायला वर्षाचा आणखी एक दिवस निश्चित झाला असा विचार करीत आम्ही दोघांनी तिला दुजोरा दिला.

या मैत्रिणीच्या घरी झालेला पहिला गणपती माझ्या अजूनही स्मरणात आहे. त्याकाळी तिला पूजेला भटजी मिळणे शक्य नव्हते म्हणून तिने माझ्याकडून गणपती पूजेची कॅसेट मागवून घेतली होती. बायकोने उकडीचे मोदक आणीन असे मैत्रिणीला आश्वासन दिले होते. ते घरी होत असताना माझ्या मुलाचा बायकोला प्रश्न "What's that ?" "Modak" बायको उत्तरली. "Is'nt that our Maushi's last name?" मुलाचा उलट प्रश्न. "उगाच भलतेच प्रश्न विचारू नकोस." मोदकाची पारी मोडली म्हणून बायको वैतागली होती. "या पोरांना जरा कल्चर शिकवायला जावे तर यांचे भलतीकडेच डोके चालते." तिची तक्रार.

आमच्या मैत्रिणीने आपले मराठी कल्चर सगळ्यांना माहिती व्हावे म्हणून मराठीच नव्हे तर इतर भाषिक भारतीय आणि अमेरिकन मित्रांनासुद्धा बोलावले होते. ठेवणीतले झब्बे आणि साड्या घालून मंडळी आली होती. पूजेला मांडी घालून बसणे मित्राला अवघड जाणार होते म्हणून टेबलावर गणपतीची स्थापना होऊन खुर्चीवर बसून पूजा केली गेली. मित्राने आरतीच्या पुस्तकातील आरत्यांच्या सगळ्यांना पुरतील एवढ्या झेरॉक्स प्रती काढून आणल्या होत्या. आरतीला सुरूवात झाली. एका हातात कागद धरून टाळ्या वाजवणे अवघड जात होते आणि त्यामुळे टाळ्यांच्या ऐवजी काहीतरी थोपटल्यासारखा कागदाचाच आवाज होत होता. एका हातात निरांजन व दुसऱ्या हातात घंटा घेऊन मित्र तयार होता. पण घंटा वाजवणे आणि निरांजन ओवाळणे हे दोन हातांचे कोऑर्डिनेशन त्याला जमत नव्हते. निरांजन हलत होते आणि घंटा ओवाळली जात होती. आरती वाचत म्हणताना तालात चुकत होती तर कोण कुठल्या पट्टीत म्हणत आहे याचा पत्ता लागत नव्हता. काही आरत्या झाल्यावर लोकांचा पेशन्स संपला. पण अचानक एका गुजराती बांधवाला त्याचे कल्चर दाखविण्याची हुक्की आली आणि त्याने 'जय जगदीश हरे' ही आरती चालू केली. आरत्या लांबल्याने लहान मुलांचे पाय दुखायला लागले आणि त्यांनी हळूहळू तेथून पळ काढला.

आरती झाल्यावर जेवणाची वेळ होईपर्यंत 'आता काय' असा प्रश्नार्थक चेहेरा करून सर्व पुरूष एकमेकांकडे बघू लागले. शेवटी पुरूषांचा प्रॉब्लेम मित्राच्या लक्षात आला. त्याने हळूच कुजबुजत ओशाळवाणा चेहेरा करून 'बायकोची ताकीद आहे. नो लिकर टुडे' अशी नावडती बातमी सर्वांना दिली. मग पुरूषांनी नाईलाजाने सॉफ्ट ड्रिंक पीत 'कोणाचे घर किती स्क्वेअर फूट आहे', 'स्टॉक मार्केटची हॉट टिप काय', 'इंडियाला जायला स्वस्त तिकीट कोणत्या एअरलाईनचे' अशा विषयांवर चर्चा करीत वेळ काढला.

प्रत्येक भगिनीने मैत्रिणीला मदत व्हावी म्हणून एक पदार्थ करून आणला होता. त्यामुळे गणरायाला लझायना, उंद्यो, ब्रॉकोलिची भाजी, सॅलड, टोमॅटो सूप, नान आणि मोदक असा इंटरनॅशनल मेनू प्रसाद म्हणून मिळाला. गणपतीपुढे काहीतरी गायन वादन व्हावे म्हणून मुलांच्या पियानो, गिटार वादनापासून, 'अग तू चांगलं गाणं म्हणतेस, म्हण एखादे' अशा सूचना एका भगिनीला झाल्या म्हणून तिने 'सध्या प्रॅक्टीस नाही' असे आढेवेढे घेत दोन–चार लवंगा खात दोन गाणी म्हटली. जेवण आणि ते गाणे या दोन्हीचा परिणाम होऊन लोकांना झोपा यायल्या लागल्या आणि लवकरच लोकांनी मित्राचा निरोप घ्यायला सुरूवात केली.

या गोष्टीला आता २५ वर्षे होऊन गेली. या मैत्रिणीची मुले कॉलेजला गेली तशी तिची कल्चर टिकविण्याची इर्षा हळूहळू कमी झाली. गेल्या काही वर्षात एच १ व्हिसावर मराठी तरूणांचा प्रचंड लोंढा अमेरिकेत आला आहे. कल्चर टिकविण्याची या नवीन पिढीची उर्मी हेवा वाटावा अशी आहे. आपल्या घरच्या गणपतीला आधीच्या पिढीतील काका–मावशांना बोलावले तर आपल्या उत्सवाला जरा प्रतिष्ठितपणा येईल असा विचार करून आम्हाला ते बोलावतात. व्यवस्थित षोडशोपचार पूजा, अथर्वशीर्षाची सहस्त्रावर्तने, पद्धतशीर आरत्या, खास मराठी जेवण असा सर्व थाट पाहून त्यांच्या उत्साहाचा अचंबा वाटतो. आमच्या मित्र–मंडळींची तिथे गाठ पडलीच तर तो सोहळा पाहून आम्ही एकमेकांकडे बघून नुसतेच गालातल्या गालात हंसतो.

**मोहन रानडे** (***brihanmm@gmail.com***)

---

**'मेघ जे तरळून गेले':** (पृष्ठ ७ वरून)– ही खास भेट खरोखरच खास आहे. "साजणा" ही पहिली उत्तम सीडी ऐकल्यानंतर नवीन येणाऱ्या या सीडीबद्दल बरीच उत्सुकता होती, अपेक्षाही होत्या. विविध प्रकारची गीतं आणि संगीत एकत्र असूनही हा संग्रह पुन्हा पुन्हा ऐकण्यासारखा झाला आहे. श्रोत्यांच्या अपेक्षा "मनमोर" बऱ्याच अंशी निश्चित पूर्ण करतो.

**वैशाली राजे,** वर्जिनिया
***vraje@hotmail.com***

## Message from MAIYTRA President

Namaskar Mandali,

For those that may not know, MAIYTRA is a sub-organization of BMM that provides a social and cultural network for second-generation young adults (ages 18-35). We organize a MAIYTRA convention every other year in a major North American city. Last summer, we hosted the very successful 2008 MAIYTRA convention in San Francisco. We will be deciding on a location for MAIYTRA 2010 soon, so stay tuned to the BMM MAIYTRA page for updates: *http://www.bmmonline.org/maiytra.htm*

This is an exciting time for us, as for the first time, we're committing ourselves to some long-term projects for the next generation. One such project, called Marathi-lite, was unveiled by the very creative Philadelphia Young Adults Programming committee while planning the 2009 BMM convention. The goal is to bridge the gap between the generations with respect to the varying levels of Marathi fluency that exist. This can be achieved by creating an environment where those with varying Marathi-speaking skills can feel like they are part of the greater Marathi community. By breaking down the language fluency barrier, we help to promote youth involvement and participation in cultural activities as well as the carrying forward of our culture to future generations. A simple commitment to speak Marathi on a daily basis wherever possible can really go a long way.

Look up Marathi-lite on Facebook: *(http://www.facebook.com/pages/Marathi-lite/54594122102 )* .

Ever been curious about the translations to some of those Marathi aartis that we always say (or hear) at Ganapati? Ever wonder what the technical instructions of wearing a sari would sound like? This and more can be found on the Free Downloads for the Next Generation page put together by the Philly convention crew: *(http://www.bmmonline.org/maiytra_downloads.htm ).*

Inspired enough to write some interesting articles of your own? We are looking to present articles written by the MAIYTRA community to the MAIYTRA community in some type of newsletter format, so reach out if have a passion for Writing.

Another goal is for us to come up with ways for members of the next-generation to stay better connected with one another between MAIYTRA conventions. A core team of young adults is focusing on creating a persistent forum for young adults to discuss ideas and expand next-generation leadership within the BMM. For instance, some ideas may include utilizing Facebook groups, a next-generation-friendly newsletter, email groups, or holding actual get-togethers in different cities. We are always open to new ideas and are always looking for enthusiastic leaders. Please email me if you're interested in being a part of any of the above efforts or have ideas for new ventures as well.

Thank you,

**Vishal Nayak**
MAIYTRA President
*maiytra.vishal@gmail.com*

## BMM Newsletter's English Synopsis

**President' Message - Madhuri Joshi:**

President visited New York and Philadelphia mandal's Ganapati puja programs. She described the slide presentation made for BMM initiatives. This mainly consists of mandal integration, Marathi shala, local talent search, Indian guest artist programs, senior citizen centers, more young generation involvement in BMM etc. BMM wants to increase paid membership to 51(100%) She urged to encourage selling of "Mom's Kitchen" book. she also announced Vaibhav Puranik as newly joined Co-editor for Vritta, along with the vrutta editorial team members and board of advisers as announced in the past month's newsletter.

**News1 :** BMM Executive Members have been assigned a group of Marathi mandal members to gather information about different subjects to build a long term relationship. Please convey your ideas to your zonal EC representatives, names are at: *http://www.bmmonline.org/presidential.htm*

**Walk through Marathi Mandals:** Philadelphia had 11 Indian Mandals together to celebrate Ganapati festival for 10 days with Arti and Prasad. Local talent program consisted of music and drama items. Marathi mandals at New York and Chicago participated in a parade for Indian Independence Day on 15th August. Los Angeles, mandal honored Late Rajabhau Mule for his valuable work in arts and literature, and Dr Gopal Marathe for his Musical talents. San Diego, Sacramento, Phoenix, Huston, Dallas Fort mandals, Triveni Mandal at Cincinnati celebrated their Ganapati festival enthusiastically through some creative and social programs.

**As I was reading - Mohan Ranade:** Here are some website links for good articles on the subject of Hindus, India-Pakistan and Indian music.

**Smarangandh by Jyotsna Ogale:** These are memories described about an old house built by forefathers and now it is being demolished. Many instances of family activities cited showing how the rooms were full of sweet memories.

**Yogashastra Lekh No 1- Sharad Dandekar:** This article defines Health as spiritual wellbeing. When we are calm by body and mind we are in good health, but when that is disturbed, we can use Yogashastra to bring back shanti. Writer goes deep into many mythological books, and explained many terms like rajyog.

**Tequila Takatak edited by Bhushan Kelkar- Book report by Vaibhav Puranik:** Book is a collection of thought provoking articles prepared by non-resident Indian authors (45).

**Manamor – Poems by Mayur Deval:** This is a new marathi CD sung by Bela Shende, Rita Sharma and Swapneel Bandodkar. CD consists of light duets and gazals.


**India trip-Swine flue mask experience– by Vinata Kulkarni:** This humorous article describes her experience about the health issue with Swine flue at the Mumbai airport and in Pune city with vivid examples of health inspectors and general public asking questions, use of different masks and remedies for swine flue.

**Shevatache Pan (Last Page) – Mohan Ranade :** This humorous article describes Ganapati Puja performed at a private function. The host wants to perform all religious detailed activities but the puja somehow starts turning into a modern potluck party.

**Anand Joshi**
BMM Board of Advisory Committee member
*anandj@optonline.net*

# JTI

Crude oil and gas production in the US, India, and Colombia, South America



Joshi Technologies International, Inc.
5801 E. 41st Street, Suite 603
Tulsa, Oklahoma 74135

918.665.6419 ◇ jti@joshitech.com

www.joshioilandgas.com

## INSURANCE & REAL ESTATE

**HEALTH INSURANCE FOR VISITORS FROM ABROAD**
Reasonable Rates. Administering this program for more than 15 years.

**LIFE INSURANCE**
Lowest rates in USA. Reputable carriers

**REAL ESTATE**
Hotels/Motels, Businesses

**Administering this program for more than 25 years**

**Contact: Shashi Thakur, Ph.D.**

Tel: (901)854-9451 Fax : (901)853-4809
Cell: (901)230-3209
E-mail: shashijthakur@gmail.com

## HEALTH INSURANCE

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

* VISITORS
* H-1 B VISA HOLDERS
* PERMANENT RESIDENTS

**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939

E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com

## SAVE DISABLED CHILDREN THRU FREE PLASTIC SURGERY





**PLEASE DONATE GENEROUSLY TO DR. DICKSHEET'S INDIA PROJECT**
**WWW.DRDICKSHEET.ORG**

**135 OCEAN PARKWAY 17C**
**BROOKLYN, NY 11218**
**PHONE— (718) 871-0280**
**E mail: murphy.pianoman@att.net**

***YOUR DONATION OF $150 CAN SAVE ONE CHILD***





बृहन्महाराष्ट्र वृत्त

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408
*Or call 1-215-354-1423 to pay by credit card.*
*Master Card, Visa, American Express and*
*Discover is accepted.*

